कॉलेजनामा

एसएनडीटी विद्यापीठ

# प्रोत्साहनपर बदलांची नांदी



**एसएनडीटी विद्यापीठ हे विद्यार्थिनींसाठी नेहमीच नानाविध कौशल्यपूर्ण अभ्यासक्रम पुरवत असते. तंत्र शिक्षणापासून ते होम सायन्सपर्यंत करिअरच्या अनेक संधी याद्वारे उपलब्ध होऊ शकतात. याच पार्श्वभूमीवर यंदाच्या वर्षी विद्यापीठातील नवे अभ्यासक्रम, नव्या सुविधा, सुरक्षेसाठी उपायोजना अशा अनेक गोष्टींबद्दल कुलगुरू डॉ. शशिकला वंजारी यांच्याशी केलेली बातचीत...**

◆ **यंदा एसएनडीटी विद्यापीठातर्फे कोणत्या नवीन अभ्यासक्रमांची सुरुवात करण्यात आली आहे?**

- एसएनडीटी विद्यापीठाच्या मुंबई विभागात यंदा बी-वोक इंटेरिअर डिझाइन आणि बी-वोक इलेक्ट्रॉनिक मॅनुफॅक्चुरिअल सर्व्हिसेस, डी-वोक इंटेरिअर डिझाइन आणि डी-वोक ग्राफिक्स अँड मल्टिमीडिया हे अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. या सर्व अभ्यासक्रमांना ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशनची (एआयसीटीई) मान्यता मिळालेली आहे. मागील वर्षी सुरू केलेल्या एम-डिझाइनचा भाग-२देखील यंदा असणार आहे. तर पुण्याला पहिले प्रोफेशनल कॉलेज (एमबीए) सुरू होत असून 'कमवा आणि शिका' योजनेवर आधारित अल्प मुदतीचे अनेक डिप्लोमा अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. एसएनडीटीतील ९० टक्के अभ्यासक्रम हे स्किल ओरिएंटेड आहेत. त्यामुळे हे अभ्यासक्रम विद्यार्थिनींना नोकरीच्या दृष्टीने फायदेशीर ठरणार आहेत.

◆ **यंदा एसएनडीटी विद्यापीठात काही नवीन बदल दिसतील का?**

- जुहू कॅम्पस परिसरात ९०० आसनी क्षमता असलेले ऑडिटोरिअम नव्याने बांधण्यात आलेले आहे. संशोधनाच्या दृष्टीने ई-लर्निंग सेंटरची, तर ऑनलाइन प्रशिक्षणाच्या दृष्टीने नव्या स्टुडिओची निर्मिती करण्यात आली आहे. अलिकडेच ग्रंथालय तसेच होस्टेल्सच्या इमारतींचेदेखील नूतनीकरण करण्यात आले आहे. त्याचसोबत 'रुसा'तर्फे मिळालेल्या निधीतून येत्या शैक्षणिक वर्षात इतर अनेक सुविधा विद्यार्थिनींसाठी उपलब्ध करून दिल्या जातील.

◆ **विद्यार्थिनींना कला-क्रीडा तसेच संशोधन क्षेत्रात प्रोत्साहन देण्यासाठी काय उपाययोजना असतील?**

- एसएनडीटी विद्यापीठ कला-क्रीडा अशा दोन्ही विभागात नेहमीच आघाडीवर राहिलेले असून त्या दृष्टीने लागणाऱ्या सर्व सुविधा विद्यार्थिनींना पुरवण्यात येतात. अलिकडेच आमच्या भाग्यश्री पुरोहित या विद्यार्थिनीला बॉक्सिंगमध्ये 'शिवछत्रपती पुरस्कार' मिळाला आहे. त्याचसोबत ऑल इंडिया युनिव्हर्सिटी सांस्कृतिक स्पर्धेच्या पुणे येथील फेरीत विद्यापीठाने दुसरा क्रमांक पटकावला आहे. एसएनडीटी विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या सर्व कॉलेजांमध्ये विद्यार्थिनींना कला, क्रीडा तसेच शैक्षणिक स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते.

◆ **विद्यार्थिनींच्या सुरक्षेच्या दृष्टीने काय उपाययोजना केल्या आहेत?**

- एसएनडीटी विद्यापीठातर्फे विद्यार्थिनी सुरक्षेसारख्या विषयाला नेहमीच प्राधान्य दिले आहे. विद्यापीठ परिसरात येणाऱ्या प्रत्येक इमारतीत, होस्टेलमध्ये त्याचसोबत गरजेच्या सर्व ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरा बसवण्यात आले आहेत. त्याचसोबत विद्यापीठाच्या चर्चगेट, जुहू आणि पुणे अशा तिन्ही विभागात कॅम्पस डेव्हलपमेंट कमिटीची स्थापना करण्यात आली असून विद्यार्थिनींच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही कमिटी अत्यंत प्रभावीपणे काम करत आहे.

(**मुलाखत :** प्रथमेश राणे)